गपूर महानगरपालिका, नागपूर

(जनसंपर्क विभाग)

प्रसिद्धी पत्रक ता. ११ ऑक्टोबर २०१९

# कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांची मालमत्ता जप्त

## मनपा धरमपेठ झोनने केली वॉरंट कारवाई

**नागपूर,ता.११:** धरमपेठ झोन अंतर्गत मौजा अंबाझरी येथील कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांविरोधात नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ झोनने वॉरंट कारवाई करत मालमत्ता जप्त केली.

धरमपेठ झोनमधील मौजा अंबाझरी येथील घर क्रमांक ३३२ वार्ड क्रमांक ७३ भाग क्र. २ मधील घरमालक रवींद्र डोंगरमल शर्मा व शशिकांत यांच्या नावे ही मालमत्ता असून त्यांनी २०१६ पासून मनपा मालमत्ता कर भरला नव्हता. त्यांच्याकडील बकाया राशी ५३,७५३ इतकी आहे. घर क्रमांक ७०८ वार्ड क्रमांक ७३ भाग क्रमांक २ मधील घरमालक श्री.एस.रमण व एस विश्वनाथन यांच्या नावे असलेल्या मालमत्तेवर २०१६ पासून २०५७३ रूपये थकीत होते. त्यांच्या घरावरही जप्तीची कारवाई करण्यात आली. याशिवाय घर क्रमांक ९५३ वार्ड क्र ७३ मधील मालमत्ता धारक बी.ए.मोहरिल यांच्या मालमत्ताही जप्त

करण्यात आली. यांच्याकडे २०१६ पासून ६५ हजार १७६ राशी थकीत होती. घर क्रमांक ११७५ वार्ड क्रमांक ७३ भाग क्रमांक २ मधील घरमालक जयदेव आत्माराम वाळवे यांच्या मालमत्तेवर २००६ पासून ६२१०८ रूपये थकबाकी होती. याव्यतिरिक्त मौजा काचीमेट येथील खुले भूखंड ८ आणि बांधकाम असलेल्या ५ इमारती जप्त करण्यात आल्या आहे. या मालमत्तेवर एकूण १ लाख ६७ हजार ५७६ रूपये थकीत करबाकी आहे.

ही सर्व कारवाई झोनचे सहायक आयुक्त प्रकाश वराडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. या कारवाईमध्ये कर निरिक्षक दीपक स्वामी, श्री.रूषिया, अशोक खेडकर, प्रसाद चेपे, आशिष ठाकरे, हिरालाल खापरे सहभागी होते.

मालमत्ताधारकांनी थकीत मालमत्ता कर तातडीने भरावा व जप्तीची नामुष्की टाळावी, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात आले आहे.